**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) अन्वये आदेश**

289

जा.क्र.सनीवै/प्रशा-२/कलम८३(१) आदेश/ /२०१८
सहाय्यक निंबधक, सहकारी संस्था, ता.वैजापूर
दि.२७.३.२०१८

वाचा :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ (१)

२. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७१

३.श्री प्रशांत झाला, विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (भूविकास बँक) औरंगाबाद यांचा धन्वंतरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म.वैजापूर चा दि.०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ या कालावधीचा चाचणी लेखापरीक्षण अहवाल या कार्यलयास प्राप्त दि ७.३.२०१८ .

४. श्री प्रशांत झाला, विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (भूविकास बँक) औरंगाबाद यांचा धन्वंतरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म.वैजापूरचा दि.०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ या कालावधीचा प्रशासकीय विशेष अहवाल या कार्यलयास प्राप्त दि ७.३.२०१८

ज्या अर्थी, धन्वंतरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म.वैजापूर या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार करण्यात आली असून तीचा नोंदणी क्र.एजेडी/व्हीपीआर/आरएसआर /सीआर /५३७/१९९८ दि.०१.०७.१९९८ असा आहे.

ज्या अर्थी , धन्वंतरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म.वैजापूर या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदीनुसार तसेच उक्त संस्थेच्या स्वीकृत व नोंदणीकृत पोटनियमातील तरतुदीनुसार चालविण्यात येते.

ज्या अर्थी, उक्त संस्थेचे निंबधक या नात्याने वैधानिक कामकाजाबाबत उक्त अधिनियम व नियम या मधील वैधानिक तरतुदीचे अनुषंगाने कारवाई/चौकशी करण्याचे अधिकार या कार्यलयास आहे.

ज्या अर्थी, श्री प्रशांत झाला, विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (भूविकास बँक) औरंगाबाद यांनी धन्वंतरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म.वैजापूर चा दि.०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ या कालावधीचे चाचणी लेखापरीक्षण करून प्रशासकीय विशेष अहवाल या कार्यलयास संदर्भ क्र.४ अन्वये दाखल केला आहे.

त्या अर्थी, श्री प्रशांत झाला, विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (भूविकास बँक) औरंगाबाद यांनी या कार्यलयास संदर्भ क्र.४ अन्वये दाखल केलेल्या विशेष अहवालातील मुद्याचे अनुषंगाने वैधानिक चौकशी करणे आवश्यक असल्याची माझी परिपूर्ण खात्री झाल्यावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ (१) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून मी एफ. बी. बहुरे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. वैजापूर याव्दारे धन्वंतरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म.वैजापूर ता.वैजापूर या संस्थेची या आदेशासोबत जोडलेल्या परिशीष्ट अ मधील मुद्दा क्र. १ ते १४ बाबत चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून श्री व्ही बी राजपूत, सहकार अधिकारी श्रेणी-१, संलग्न- सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. वैजापूर यांची नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ आणि नियम १९६१ चे नियम ७१ मधील तरतुदीनुसार चौकशी करून चौकशी अहवाल या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यात आत या कार्यलयासं सादर करावा.

सदरचा आदेश आज दि. २७.३.२०१८ रोजी माझ्या सही व कार्यलायाचे मुद्रेसह निर्गमित करीत आहे.

(एफ.बी.बहुरे )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था ,ता.वैजापूर

प्रति- १. प्राधिकृत चौकशी अधिकारी तथा, श्री व्ही बी राजपूत, सहकार अधिकारी श्रेणी-१, संलग्न- सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. वैजापूर, यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

२.चेरमन / व्यवस्थापक, धन्वंतरी महिला नागरी सहकारी पतसंस्था म.वैजापूर ता.वैजापूर यांना देवून सूचित करण्यात येते कि, त्यांनी चौकशीकामी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना आवश्यक ते अभिलेख उपलब्ध करून देऊन चौकशी कामी सहकार्य करावे.

प्रत-१.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२.मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक , सहकारी सस्था औरंगाबाद यांना देवून विनंती करण्यात येते कि,प्राप्त प्रशासकीय विशेष अह्वलानुसार सस्थेची वैधानिक चौकशी प्रस्तावित केली आहे. तरी सदर अहवाल निकाली काढावा. हि विनंती.

सहाय्यक निंबधक,
सहकारी संस्था ,ता.वैजापूर